0 7 AUG 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उन्हाळी सत्रातील परीक्षांना मंगळवारपासून प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील (मार्च-एप्रिल २०२१) मधील कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा मंगळवार (दि. १० ऑगस्ट) ते १५ सप्टेंबरदरम्यान होणार आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या परीक्षा ऑनलाइन आणि बहुपर्यायी प्रश्नावली (एमसीक्यू) पद्धतीने होणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील २ लाख २० हजार विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली आहे.



## पेपर सोडविण्यास एक तास

या परीक्षा ५० गुणांसाठी घेण्यात येणार असून, त्यासाठी २५ बहुपर्यायी प्रश्नांचा पेपर असणार आहे. पेपर सोडविण्यासाठी एक तासाचा वेळ असणार आहे.

पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि एम. फिल., प्रि-पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने महाविद्यालय आणि अधिविभागांच्या पातळीवर होतील. औषधनिर्माण, विधि, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांच्या पदवी, पदव्युत्तर परीक्षा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांसाठी विद्यापीठाने नेमलेल्या समन्वयक महाविद्यालयांकडून घेण्यात येणार आहेत. बी. एस्सी. च्या परीक्षा मंगळवारपासून सुरू होतील. बी. ए., बी. कॉम. अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. १८ ऑगस्टपासून सुरू होतील. ऑनलाइन परीक्षांची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, या उद्देशाने सराव चाचणी (मॉक टेस्ट) शुक्रवारपासून सुरू झाली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

लोकमत

# पूरग्रस्तांना विद्यापीठाचा मदतीचा हात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने सामाजिक बांधीलकी जपत शाहूवाडी तालुक्यातील करंजफेण, पाल आणि सावर्डी आदी गावातील पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला. या परिसरातील पूरग्रस्त सातशे कुटुंबांना धान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तू, स्वच्छता किट वाटप केले.

विद्यापीठाकडे पुणे येथील नॉर ब्रॅमसे, ग्लोबल केअर यांच्या सीएसआर फंडातून आणि वर्क फॉर इक्वॅलिटी या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून या जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. विद्यापीठाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलमेंटच्या समाजकार्य अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी या मदतीचे वाटप केले. त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक डॉ. एस. एम. गायकवाड आणि समाजकार्य अधिविभागातील सहायक संचालक अमोल मिणचेकर यांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांचे पथक कार्यरत होते. करंजफेण परिसराला पुराचा मोठा तडाखा बसला आहे. या सामाजिक उपक्रमासाठी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. दरम्यान, विद्यार्थी आणि शिक्षक करंजफेण परिसरात ग्रामीण विकासाचा आढावा घेण्यासाठी मुक्कामी होते. या काळात गावकऱ्यांशी ऋणानुबंध निर्माण झाले होते.

पुढारी

# मान्सून का बदलतो, याचा विचार करणे गरजेचे : प्रा. मोटे

**कोल्हापूर :** मान्सून का बदलत आहे, याचा विचार आपण करणे गरजेचे आहे. बांधकाम, वृक्षतोड, प्लास्टिक कचरा, खोदकाम केल्यामुळे महापुराची समस्या निर्माण होत आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. युवराज मोटे यांनी केले.

कोतोली येथील चौगुले महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत 'महापूर, भूस्खलन आणि पर्यावरणीय बदल' या विषयावर आयोजित केलेल्या ऑनलाईन एक दिवसीय कार्यशाळेत डॉ. युवराज मोटे बोलत होते. दुसऱ्या सत्रामध्ये विनायक खोत यांनी मार्गदर्शन केले संस्था सचिव शिवाजीराव पाटील, डॉ. अजय चौगुले, डॉ. श्रीमती बी. एस. शिंदे आदी उपस्थित होते.

पुढारी

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## I Extention for E-Tender No. 705, 708, To 711.

It is hereby notified to the concerned that the last date for submitting online tender has been extended for 1) Supply, Installation & commissioning of Fluorescence Microscope, [705] 2) Supply & Installation of Wooden Furniture, (708) 3) Desktops Computer & Workstation, (709) 4) Laptops, (710) 5) Projectors. (711) **till 13/08/2021 up to 5.00 p.m.** The details are available on web-site **"http://unishivaji.sets.co.in"** Those who have submitted tender earlier need not submit it again. University reserve Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. .

SU/Stores/ **Dr. Vilas.D.Nandavadekar**

Date- 07/08/2021 Registrar

पुढारी

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## 2nd Extension for E-Tender Notice

## No 704, Sr. No. 704-12

Shivaji University invites 2nd extension for online tender No. 704, (Sr. No. 704-12 - Fogging on university campus.) for one year. Relevant Tender documents are available on web-site "**http://unishivaji.sets.co.in**" Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL.

**Right to accept or reject any or all tenders is reserved by the University without assigning any reason.**

**Last date of Tender submission :- 13/08/2021 up to 03.00 pm.**

SU/Engg/ **Dr. Vilas D. Nandavadekar**

Date:-07/08/2021 Registrar

पुण्यनगरी

# प्रा. तेजस्विनी आडनाईक यांची निवड

**नवे पारगाव :** तळसंदे (ता. हातकणंगले) येथील डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसच्या तेजस्विनी शरद आडनाईक यांची राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाअंतर्गत वारणा विभागीय समन्वयक म्हणून शिवाजी विद्यापीठाकडून निवड करण्यात आली आहे.



तेजस्विनी आडनाईक यांनी डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस व राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत परखंदळे व ऐतवडे खुर्द या गावांमध्ये रक्तदान शिबिर, महिला सक्षमीकरण, आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा, स्वच्छता अभियान, लेक वाचवा-लेक शिकवा अभियान आदी विविध उपक्रम निवासी शिबिराअंतर्गत राबविले आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष गृहराज्यमंत्री सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, संचालक डॉ. सतीश पावसकर, रजिस्ट्रार प्रकाश भागाजे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

07 AUG 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाने पुसले करंजफेण पूरग्रस्तांचे अश्रू

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाने सामाजिक बांधिलकी जपत करंजफेण, पाल, सावर्डी (ता. शाहूवाडी) या गावातील पूरग्रस्तांचे अश्रू पुसण्याचे काम केले. या परिसरातील ७०० कुटुंबांना धान्य, इतर जीवनावश्यक वस्तू, स्वच्छता किटचे वाटप करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाकडे पुणे येथील नॉर ब्रॅमसे, ग्लोबल केअर यांच्या सीएसआर फंडातून तसेच वर्क फॉर इक्वॅलिटी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या. शिवाजी विद्यापीठाचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलमेंटच्या समाजकार्य अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी ही मदत वितरणासाठी पुढाकार घेतला.

आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एम. गायकवाड, समाजकार्य अधिविभागातील सहायक संचालक अमोल मिणचेकर यांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांच्या सहाय्याने ही मदत गरजूंपर्यंत पोचविली.

करंजफेण परिसराला पुराचा तडाखा बसला; मात्र हा परिसर दुर्गम असल्याने सुरूवातीला तीव्रता लक्षात आली नव्हती. करंजफेण, पाल, सावर्डी गावातील सत्तर टक्क्यांहून अधिक घरे पाण्यात होती. १२ घरे अतिवृष्टीने जमीनदोस्त झाली. शेतीचेही नुकसान झाले. प्रशासनाची मदत पोहोचणे जिकीरीचे ठरत आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेऊन गरजू असलेल्या दुर्गम भागातील पूरग्रस्तांना ही मदत पोहोचवली. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## विद्यार्थ्यांचे ऋणानुबंध

समाजकार्य अधिविभागातील विद्यार्थी, शिक्षक करंजफेण परिसरात दोन वर्षांपूर्वी ग्रामीण विकासाचा आढावा घेण्यासाठी आठवडाभर मुक्कामी होते. या काळात विद्यार्थ्यांचे संबंधित गावकऱ्यांशी ऋणानुबंध जुळले होते. ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला असताना हेच विद्यार्थी मदत साहित्य घेऊन गावात आले.

तरुण भारत

## महाविद्यालय १५ सप्टेंबर १ ऑक्टोबरदरम्यान

सध्या राज्यातील विविध जिल्ह्यांमधील कोरोना स्थितीचा आम्ही आढावा घेत आहोत. त्याचा अहवाल लवकरच प्राप्त होईल. त्यानुसार १५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीमध्ये कॉलेजेस प्रत्यक्ष सुरु करण्याचा सरकारचा विचार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. कॉलेजेस सुरु करण्याबाबत ८ दिवसांत निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी याआधी म्हटले होते. तसेच प्रत्येक जिल्ह्याची कोरोनास्थितीत वेगळी असल्याने प्रत्येक ठिकाणी तारखाही वेगवेगळ्या असतील, आणि त्याबाबतचे निकषही वेगवेगळे असतील असेही त्यांनी सांगितले होते.

पान ९ पहा

## महाविद्यालय १५ सप्टेंबर १ ऑक्टोबरदरम्यान

पान १ वरुन

ते म्हणाले, राज्यात कोरोनाची स्थिती हळूहळू नियंत्रणात येत आहे. अनेक ठिकाणी शाळा सुरु झाल्या आहेत. आता कॉलेज सुरु होण्यासंदर्भात चर्चा सुरु आहे. राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक पार पडली. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कॉलेज सुरू करण्याचा विचार आहे, असे ते म्हणाले.

प्रत्येक विभागात कुलगुरुंना जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करुन संबंधित जिल्ह्यातील कोरोना स्थितीचा आढावा घ्यायला सांगण्यात आले आहे. संपूर्ण स्थितीचा आढावा १५ दिवसात प्राप्त होईल. त्यामुळे १५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंतच्या कालावधीत कॉलेजेस प्रत्यक्ष सुरू होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

0 7 AUG 2021

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमोडीटीज्मधील परताव्याची माहिती विद्यार्थ्यांना द्या

## कमोडीटीज् एक्स्चेंज ऑफ इंडियाचे आशुतोष वशिष्ट : व्यवस्थापनच्या प्राध्यापकांना आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सोने, चांदीपासून ते कपाशी पिकापर्यंतच्या वस्तूंवर होणाऱ्या वायदे बाजाराचा व्यापार हा कमोडीटीज् मार्केटमध्ये चालत असतो. त्याचा लाभ गुंतवणूकदारांबरोबरच छोट्या व्यावसायीकांना ही मिळत असतो हे जगजाहीर आहे. त्यामुळे वाणिज्य व व्यवस्थापनच्या प्राध्यापकांनी कमोडीटीज् मार्केटमधील ज्ञान अवगत करुन त्यातील विविध संकल्पना व अद्ययावत ज्ञान प्राप्त करुन ते विद्यार्थ्यांपर्यंत सातत्याने पोहोचवण्याचे काम करावे. तसेच कमोडीटीज् मार्केटमधील परताव्याच्या संधींची माहिती देऊन त्यांना आर्थिक सबल होण्याच्यादृष्टीने पावले टाकण्यास उद्युक्तही करावे, असे आवाहन मल्टी कमोडीटीज् एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे सहाय्यक उपाध्यक्ष आशुतोष वशिष्ट यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन पद्धतीने आयोजित केलेल्या 'कमोडीटीज् डेरीव्हेटीव्ह प्रोग्राम' या प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग व मल्टी कमोडीटीज् एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे विभाग प्रमुख व अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन हे होते. सलग पाच दिवस सुरु राहिलेल्या शिबिरात महाविद्यालय व विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विषयाचे प्राध्यापक सहभागी होते. त्यांना आशुतोष वशिष्ट यांनी कमोडीटीज् डेरीव्हेटीव्ह प्रोग्राम, कमोडीटीज् मार्केट व मार्केटमध्ये केल्या जाणाऱ्या गुंतवणूकीतून मिळणारा लाभ यांची माहिती दिली. हीच माहिती विद्यार्थ्यांना देऊन त्यांना रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याचे आवाहन करा, असेही वशिस्ट यांनी सांगितले. डॉ. गंधाली खारगे व प्रा. राम मधाळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले.